# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिरडी ४२३ १०९.
तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक (०-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक -०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

मुंबई कार्यालय - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३

## सन २०२३-२४
## (माहे एप्रिल-२०२३ ते मार्च-२०२४ अखेर)
## श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय व मंदिर विभागांसाठी खाद्यतेल पुरविणेबाबत ई-निविदा

१. एप्रिल २०२३ ते जून २०२३
२. जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३
३. ऑक्टोबर २०२३ ते डिसेंबर २०२३
४. जानेवारी २०२४ ते मार्च २०२४

A. **निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय व मंदिर विभागांसाठी खाद्यतेल पुरविणेबाबत ई-निविदा**

B. **ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना /भागीदारी संस्था असल्यास अद्यावत भागीदारी प्रमाणीत( पॉवर ऑफ अटर्नी) केल्याची प्रत / संस्था, कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/खाजगी कंपनी प्रमाणपत्र/सोसायटी /गव्हर्मेंट अन्डरटेकींग / कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/पार्टनरशिप डिड (निबंधकाकडून नोंदणी केलेल्या), आर्टीकल ऑफ असोसिएशन, सोसायटी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने FSSAI परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

५. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ या ३ आर्थिक वर्षांची **किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू.१,३८,७०,०००/- (रू.एक कोटी अडतीस लाख सत्तर हजार) असणे अनिवार्य राहील.** तसे उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

६. निविदाधारकाने ज्या ब्रॅण्डची न्युनतम निविदा मंजूर होईल त्या कंपनीचे FSSAI परवाना प्रत नंतर सादर करावी लागेल.

C. **निविदाधारकाने तेलाचे नमुने सादर करण्याची पध्दत-**

१. निविदाधारकाने निविदा भरलेल्या नमुना खाद्यतेलाचे १ लिटर/५०० मिली पाऊच म्हणून स्वतंत्र कापडी पिशवीमध्ये सिलबंद करून किंवा तेलाचा डबा संस्थानच्या खरेदी विभागामध्ये विहित मुदतीत जमा करणे अनिवार्य राहिल. कापडी पिशवीवर मालाचे नांव/प्रकार तसेच आपले फर्मचे नांव लिहिलेले असावे. दिलेले नमुने कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत अगर बदलता येणार नाहीत.

२. खाद्यतेलाचा उच्चतम दर्जाचा एकच नमुना सादर करावा. दोन किंवा अधिक नमुने सादर करू नये. तसे केल्यास एकाच नमुन्याचा विचार केला जाईल.

३. निविदा भरलेल्या खाद्यतेलाचे नमुने सादर करताना कोणत्या ब्रॅण्डचे नमुन्यांचा पुरवठा करणार हे नमुने जमा करतांना लेखी पत्र देणे गरजेचे आहे.

४. निविदाधारकाने खाद्यतेलाचा नमुना देताना नमुना निवडीसाठी असा नमुना द्यावा की पुरवठा आदेश मिळालेनंतर त्याच ब्रॅण्डचा संस्थानला पुरवठा होईल.

D. **पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. सदर निविदा भरणेकामी एप्रिल ते जून २०२३, जुलै ते सप्टेंबर २०२३, ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ व जानेवारी २०२४ ते मार्च २०२४ अशा प्रत्येकी ३ महिन्यांच्या कालावधीसाठी BOQ चे ४ भाग करण्यात आले आहेत. निविदाधारकास निविदा भरणेकामी वरील नमूद कालावधीप्रमाणे ४ BOQ मध्ये दर भरावे लागतील. निविदाधारकास ४ ही तिमाहीसाठीची निविदा भरणे बंधनकारक नाही. तथापि निविदेत एक/दोन/तीन/चार अशा कुठल्याही एका भागासाठी दर भरल्यास अगर ४ ही भागांसाठी दर भरल्यास निविदा फी व बयाणा रक्कम तेवढीच राहील. प्रत्येक भागामध्ये भरलेल्या दरांचा विचार करून अंतिम निर्णय घेण्यात येईल.



2813

२. निविदा फी रक्कम रु.२४,२००/- व बयाणा रक्कम रु.२,४२,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. **MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.**

**E. निविदाधारकांसाठी सुचना-**

१. सदर निविदा दि. १२/ ४ /२०२३ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. ४ / ५ /२०२३ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. ई-निविदा भरलेल्या खाद्यतेलाचे नमुने दि. ५ / ५ /२०२३ ते दि. ६ / ५ /२०२३ अखेर सायं. ५.०० वाजेपर्यंत (रविवार खेरीज) संस्थानचे शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

३. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

४. शक्य झाल्यास दि. ८ / ५ /२०२३ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्याच कमर्शिअल निविदा उघडण्यात येतील.

५. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये सादर करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

६. नमुने नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

**F. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-**

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS, TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर तसेच पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च, जकात, वाहतूक, वाराई वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार विभागामध्ये पोहोचचे दर या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत.

२. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**३. निविदाधारकाने ऑनलाईन दर भरतांना प्रती क्विंटलचे दर भरावेत.**

**G. ऑनलाईन निविदा उघडण्याची व नमुने निवडण्याची कार्यपध्दती-**

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेल्या खाद्यतेलाचे नमुने तज्ञ समितीमार्फत निवडण्यात येतील.

२. नमुने निवडून अंतिम झालेनंतर कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन नमुने निवड झालेल्या निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी चर्चा व वाटाघाटी करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

**H. खादयतेलाचा पुरवठा करावयाचे ठिकाण-**

१. निविदेत नमूद केलेल्या खाद्यतेलाचा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे श्री साईमंदिराचे जवळील भांडार विभागामध्ये अगर बायपास रोडवरील संस्थानच्या गोडावूनमध्ये करावा लागेल. प्रसंगी प्रसादालय विभाग या ठिकाणीही पुरवठा करावा लागेल.

...२...

८/२८/३

**H. खादयतेलाचा पुरवठा करावयाचे ठिकाण-**

१. निविदेत नमूद केलेल्या खाद्यतेलाचा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे श्री साईमंदिराचे जवळील भांडार विभागामध्ये अगर बायपास रोडवरील संस्थानच्या गोडावूनमध्ये करावा लागेल. प्रसंगी प्रसादालय विभाग या ठिकाणीही पुरवठा करावा लागेल.

**I. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-**

१. 7शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत खादयतेलाचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून संस्थानकडे ठेवावी लागेल निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या सदर खादयतेलाचा पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी पुरवठाधारकास आदा करावी लागेल.

**J. खादयतेलाचा पुरवठा करण्याची मुदत -**

१. खाद्यतेलाचा पुरवठा करण्याचा कालावधी एप्रिल ते जून २०२३, जुलै ते सप्टेंबर २०२३, ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ व जानेवारी २०२४ ते मार्च २०२४ असा राहिल.

२. खाद्यतेल मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसात खाद्यतेलाचा पुरवठा करावा लागेल. प्रसंगी दूरध्वनीवर कळविलेसही पुरवठा करावा लागेल.

३. नैसर्गिक आपत्ती, महामारी यामुळे जर मंदिर बंद ठेवावे लागले तर अशा कालावधीमध्ये ई-निविदेमध्ये खरेदी करण्यासाठी दर्शविलेले अंदाजे परिमाण (Estimated Quantity) प्रमाणे माल खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही. प्रसादालयासाठी लागणा-या खाद्यतेलाची आवश्यकता ही प्रसादभोजन घेणा-या साईभक्तांच्या संख्येवर अवलंबून असल्यामुळे ई-निविदेमध्ये दर्शविलेल्या अंदाजे परिमाणापेक्षा कमी किंवा जास्त मालाची गरज भासू शकेल. त्यामुळे ई-निविदेतील अंदाजे परिमाण (Estimated Quantity) इतका माल खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही.

४. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा तेलाची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या तेलाचा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

५. पुरवठा आदेश दिल्यानंतर पुरवठा आदेशात नमूद खादयतेलाचा पुरवठा हा एकदम करावयाचा नसून संस्थानचे गरजेप्रमाणे दरमहा मागणी चलन पुरवठादारास पाठविण्यात येतील. त्यामुध्ये नमूद परिमाण इतकेच तेलाचा पुरवठा करावा लागेल. पुरवठा आदेशात नमूद केलेल्या परिमाणा (Quantity) ही अंदाजे रहाणार असून भक्तांच्या संख्येनुसार प्रत्यक्ष मागणी अवलंबून रहाणार आहे. त्यामुळे ई-निविदा किंवा पुरवठा आदेशात नमूद मालाइतके परिमाण (Quantity) खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही.

**K. तेलाचा स्वीकार करण्याची पध्दत-**

१. पुरवठा आदेशातील ब्रॅन्ड/वर्णनाप्रमाणेच खाद्यतेलाचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे.

२. ज्या ब्रॅण्डच्या निविदा मंजुर होतील त्याच ब्रॅण्डचे तेल पुरवावे लागेल. वेगळया ब्रॅण्डचे अगर खराब तेल स्विकारले जाणार नाही. अशा तेलाचा पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. ते न नेल्यास त्या खादयतेलाची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठाधारकाला पुरवठा आदेश दिलेनंतर संस्थानचे तज्ञ समितीने निवडलेल्या ब्रॅण्डप्रमाणे तेल पुरवणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल.

..३...

283

४. पुरवठा आदेशाप्रमाणे संस्थानकडे तेल पाठविल्यानंतर संस्थानने विहीत केलेले यंत्रणेकडून तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास तेल स्विकारण्यात येईल. पुरवठाधारकांनी दिलेल्या नमुन्याप्रमाणे तेल पुरविण्याची दक्षता घ्यावी.

५. पुरवठा करीत असलेल्या तेलाची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन तेल स्विकारले जाते. तथापी तेल स्विकारलेनंतरही एखादा लॉट, डबा खराब आढळल्यास ते तेल स्वखर्चाने बदलून द्यावे लागेल.

६. खाद्यतेलाच्या डब्यावरचे लेबल अन्न सुरक्षा नियम २०११ व वैध मापन शास्त्रच्या तरतुदीप्रमाणे असावे. यामध्ये खालील बाबींचा उल्लेख असावा.

१. उत्पादकाचा FSSAI Lic No.

२. Brand & Quantity

३. Lot No/ Batch No & Date of Manufacturing and Best before

४. कायदयाप्रमाणे गुणवत्ता व मानके याविषयी हमी (Warranty)

७. खाद्यतेल ज्या लॉटचे असेल त्याचा विश्लेषण अहवाल (Analysis Certificate) N.A.B.L./Govt. Lab/उत्पादक कंपनीच्या Standard Lab चा असणे आवश्यक आहे. त्याची प्रत संस्थानला खादयतेल पुरविताना देण्यात यावी.

८. खादयतेलाचा पुरवठा १५ किलो/लिटरचे नवीन टिन डब्यामध्ये करावे लागेल. तसेच डब्याला शक्यतो बेरीकॅप पध्दतीचे झाकण असावे.

९. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेल्या खादयतेलामध्ये भेसळ अथवा ते कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित पुरवठाधारकाची राहील.

१०. खादयतेल पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade असावे.

११. पुरविलेले खादयतेलाच्या डब्याचे वजन वगळता येणारे वजन विचारात घेतले जाईल.

## L. लॅब तपासणीची कार्यपध्दती-

१. पुरविलेल्या खादयतेलाची गरजेनुसार संस्थान प्रयोगशाळा/जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/NABL/केंद्र शासनाच्या/राज्यशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

२. संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या खादयतेलाचे रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास सदर खादयतेल बदलून द्यावे लागेल. त्यादरम्यान संस्थानला बाहेरुन खादयतेल विकत घ्यावे लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेला खादयतेलाच्या किंमतीच्या ५ टक्के दंड देय असलेल्या कुठल्याही बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

३. काही वेळेस लॅब रिपोर्ट येण्यासाठी विलंब होतो अशा वेळी जर आलेले तेल वापरले गेले व नंतर लॅब रिपोर्ट FSSAI Standard प्रमाणे न आल्यास त्या लॉटमधील खादयतेलाच्या किंमतीच्या ५ टक्केपर्यंत दंड आकारला जाईल.

४. खादयतेलाचा लॅब रिपोर्ट सलग तीन वेळेस FSSAI Standards नुसार न आलेस सदर पुरवठाधारकावर संस्थानकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. संस्थान लॅबचा रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास केंद्र शासनाच्या मुंबई येथील शासकीय/NABL लॅबमध्ये भांडार विभागाकडून तेच सॅम्पल तपासणी करुन त्याची पुर्न खात्री करण्यात येईल. सदर लॅबचा तपासणी अहवाल अंतिम समजण्यात येईल.



२८३

**M बील आदा करण्याची पध्दती-**

१. पुरविलेल्या खादयतेलाचे बिल त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. सदर पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. खादयतेलाची तपासणी करुन ताब्यात घेतलेल्या तेलाचे बील संस्थानकडे सादर केलेपासून ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल.

३. पुरवठाधारकाने पुरविलेले खादयतेल संस्थानने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून खादयतेल खेरदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर बिलातुन वसुल केली जाईल.

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.

**N. आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

१. पुरवठा आदेशातील खादयतेल मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या खादयतेलाची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या खादयतेलाची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. खादयतेल पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसांचे आत खादयतेलाचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचा नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशा इतके खादयतेल दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या खादयतेलासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या खादयतेलाच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

३. निविदेतील मंजूर दराने व निवडलेल्या नमुन्याप्रमाणे खादयतेलाचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने खादयतेलाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा खादयतेल पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन खादयतेल खेरदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच याबाबत संस्थानच्या मा.तदर्थ समिती/ मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

४. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक खादयतेलाचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजूर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर मा.तदर्थ समिती/ मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

...५...

५. निविदाधारकाने स्वत:साठी अगर निविदाधारकासाठी कुनीही कोणत्याही स्वरूपाचा, कोणत्याही कारणास्तव संस्थानचे विरोधात केलेला दावा/अर्ज कोणत्याही न्यायालयात प्रलंबीत नसावा. तसेच निविदाधारकाचे नाव संस्थानचे काळया यादीत समावेश नसावे. जर संस्थान विरोधात दावा दाखल केलेला असल्यास सदर निविदाधारकांच्या निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

## O निविदा वैधता कालावधी-

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतिम तारखेपासून १२० दिवसांचा राहील.

## P. सर्व साधारण अटी शर्ती

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पयावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. पुरवठादाराचे/ संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

३. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

४. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात खादयतेल पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या तेलाच्या ५० टक्के तेलाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण खादयतेलाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

५. पुरवठादाराने खादयतेलाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल. याबाबत मा.तदर्थ समिती/ मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची काहीही तक्रार चालणार नाही.

६. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

७. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

८. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा ज़ादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(राहूल जाधव)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

...६...

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------

ऑफीस- ------------------------------------------------------------

दुकान- ------------------------------------------------------------

निवास- ------------------------------------------------------------

मोबाईल नंबर- ------------------------------------------------------------

फॅक्स नंबर- ------------------------------------------------------------

ई –मेल ------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ------------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ------------------------------------------------------------

२. ------------------------------------------------------------

६. बॅंक खाते नांव १.------------------------------------------------------------

शाखा २. ------------------------------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.------------------------------------------------------------

आयएफएससी कोड ४.------------------------------------------------------------

दिनांक :- / /२०२३

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का



७/२८/३

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अदययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/तत्सम शासकीय परवाना/ भागीदारी संस्था असल्यास अद्यावत भागीदारी प्रमाणीत( पॉवर ऑफ अटर्नी)केल्याची प्रत/ संस्था, कंपनी नोंदणी प्रमाणपत्र / खाजगी कंपनी प्रमाणपत्र /सोसायटी /गर्व्हमेंट अन्डरटेकींग/ कंपनी नोंदणी प्रमाणपत्र /पार्टनरशिप डिड (निबंधकाकडून नोंदणी केलेल्या), आर्टीकल ऑफ असोसिएशन, सोसायटी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement

३. पॅन कार्ड

४. २०१९-२०,२०२०-२१, २०२१-२२ या आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र (किमान वार्षिक उलाढाल रू.१,३८,७०,०००/- असणे अनिवार्य)

५. अदयावत अन्न आणि औषध प्रशासन नोंदणी परवाना (FSSAI परवाना)

**ब) खादयतेलाचा नमुना स्वतंत्र कापडी पिशवीमध्ये वरच्या बाजुस मालाचा प्रकार, फर्मचे नांव इ. तपशिलासह स्वाक्षरी करुन सिलबंद असलेले**

**क) नमुने दिलेल्या मालाची यादी**

दिनांक - / /२०२३

ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

...८...

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– माहे एप्रिल ते जून २०२३, जुलै ते सप्टेंबर २०२३, ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ व जानेवारी २०२४ ते मार्च २०२४ करिता प्रसादालय व मंदीर विभागांसाठी खाद्यतेल पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तीचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या खादयतेलाचा आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर तेलाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त तेलाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या ब्रॅण्डच्या खादयतेलाची निविदा मंजुर होईल त्या मान्य दराने पुरवठा करण्याची हमी म्हणून, एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच विहीत केलेल्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे तेल वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२३
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव — सही/सहंया व शिक्का

(१) ------------------------------------

(२) ------------------------------------

**सोबत-** कागदपत्रे



28/3

# वार्षिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------ यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या ३ आर्थिक वर्षांची आर्थिक उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन २०१९-२० | |
| २ | सन २०२०-२१ | |
| ३ | सन २०२१-२२ | |
| | एकुण | |
| | ३ वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल | |

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट
(नाव/ सही शिक्का)
नोंदणी क्रमांक.

दिनांक :- / /२०२३
ठिकाण :-

# SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, (SHIRDI)

**SHIRDI – 423109**

**TAL-RAHATA, DIST.-AHMEDNAGAR**

Telephone No. (02423) 258500, Purchase Dept. 258771, 258772
Fax No.02423- 258870
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in
2.purchase@sai.org.in

**Mumbai Office – Sainiketan, 804 B, Dr.Babasaheb Ambedkar Road, Dadar Mumbai – 400014, Telephone No.** (022) 24166556, 24161293

Year 2023-24

(April 2023 to March-2024)

E-Tender for supplying of Edible Oil to Prasadalaya Dept.of Shri Saibaba Sansthan

1. April 2023 to June 2023
2. July 2023 to September 2023
3. October 2023 to December 2023
4. January 2024 to March 2024

3/283

A. **TENDER DETAILS- E-Tender for Supply of Edible Oil for Prasadalaya and Temple Departments of Shri Saibaba Sansthan.**

B. **Details of documents to be submitted along with e-tender, financial turnover criteria etc. are as follows-**

1. It will be mandatory to submit shop registration certificate/ certificate from local self-government body/ similar government license/Certified copy of latest partnership deed in case of partnership firm/ Firm/Company/Sanstha Registration Certificate. i.e. Power of attorney in case of Partnership firm/Public Limited Company/ Private Limited Company/Society/Government undertaking/ Company Registration Certificate/Partnership Deed, duly registered with Registrar, Articles of Association, Society Registration Certificate as the case may be.
2. It will be mandatory to submit the GST Registration Certificate or GST Online Registration Receipt online in the name under which the tender is to be submitted.
3. Online submission of updated FSSAI/BIS license/degree of its equivalence in the name under which the tender is to be submitted will be mandatory.
4. It will be mandatory to submit PAN card online in the name in which the tender is to be submitted.
5. Minimum annual average turnover of **Rs.1,38,70,000/- (Rs. One Crore Thirty Eight Lacs Seventy Thousand)** for the 3 financial years of the year 2019-20, 2020-21, 2021-22 of the firm under whose name the tender is to be submitted. It will be mandatory to submit the certificate of CA online as per the format given along with the tender.
6. The tenderer will then have to submit FSSAI/BIS license copy of the company whose brand the minimum tender will be approved.

C. **Procedure for submission of samples of Edible Oil by the tenderer-**

1. It will be mandatory for the tenderer to seal 1 liter/500 ml. samples of the tendered Edible Oil in a separate cloth bag or Oil container and submit the list of filled items to the purchase department of the Sansthan within the prescribed time limit. The cloth bag should be marked with the name/type of goods and your firm name. Samples provided cannot be returned or exchanged for any reason.
2. Only one sample of highest quality should be submitted for one item/material. Two or more samples should not be submitted for one type of goods. If so, only one sample will be considered.
3. While submitting the tendered edible oil samples, it is necessary to give a written letter stating which brand will supply the samples while submitting the samples.
4. The tenderer shall provide such samples for selection of samples while providing samples of Edible oil after receipt of supply order. The Edible oil of the same type will be supplied to the Sansthan.

D. **Details of materials to be supplied, tender fee and earnest money-**

1. The BOQ has been divided into 4 parts for the period of 3 months each i.e. April to June 2023, July to September 2023, October to December 2023 and January 2024 to March 2024. The tenderer will have to fill the rates in 4 BOQs as per the above mentioned period. The tenderer is not bound to fill the rates for all quarters. However, if the rate is filled for any one part i.e. one/two/three/four in the tender

or if the rate is filled for 4 parts, the tender fee and earnest money will remain the same. The final decision will be taken considering the rates filled in each part.

2. Tender fee amount of Rs.24,200/- and deposit amount of Rs.2,42,000/- should be paid online on the website www.mahatenders.gov.in.

3. **Exemption of non-payment of tender fee and earnest money under MSME is not applicable to this tender. All tenderers are required to pay tender fee and earnest money.**

E. **INSTRUCTION TO TENDER HOLDERS-**

1. The said tender will be available for downloading and uploading on the website www.mahatenders.gov.in from 14/4/2023 from 11.00 am. To 4/5/2023 upto 5.pm.

2. Samples of edible oil filled in e-tender should be deposited in the office of the Purchase Department at Shirdi from 5/5/2023 to dt. 6/5/2023 upto. 5.00 pm (except Sundays)

3. Only online documents are to be submitted along with e-tender. Documents should not be submitted in hard copy. Documents submitted in hard copy will not be considered.

4. If possible Online Technical Bid will be opened on Dt. 8/5/2023. Commercial bids will be opened only from the tenderers qualified in the technical bid.

5. You or your representative must be present on the opening day of Commercial Bid. While submitting the online tender, the tenderers should mention their phone numbers in the online tender so that the eligible tenderers can be informed about the date and time of opening of the Commercial Bid.

6. Tenders without samples will not be considered.

F. **To mention rates including all taxes and charges while submitting rates online in the tender-**

1. The rates should be quoted inclusive GST, GST-TDS, TDS or any other government taxes as well as packing and forwarding charges, and taxes such as Zakat, *Warai* etc.

2. Taxes applicable from time to time as per government rules will be binding on the supplier and the amount will be deducted from the bill accordingly. The Government vide Circular No. 201809281714366605 has directed to deduct 2% GST-TDS from supplies to suppliers for taxable goods/services or both with effect from 1st October 2018. The tenderer should consider it while submitting the tender. More information on this is available on the Maharashtra Government website.

3. **The tenderer should fill up the rates per quintal while filling the tender online.**

G. **Procedure for Opening Online Tender and Selection of Samples-**

1. After the closure of **download** period of the tender, the online technical e-tenders will be opened firstly in the meeting of the procurement committee. After that, the samples of the goods submitted by the qualified tenderers in the technical tender will be selected through the expert committee.

2. After finalizing the samples, the commercial bids will be opened and the prices of the selected tenderers will be compared and discussed and negotiated with the lowest bidders and the final decision will be taken accordingly.

...2...

**H. Place to supply materials-**

1. The supply of edible oil mentioned in the tender has to be done at the Sansthan's Store department near Shri Sai Mandir at Shirdi or at a godown of the Sansthan on Bypass Road. Occasionally, it will also have to be supplied at Prasadalaya department.

**I. Security deposit amount and agreement-**

1. As per government procurement regulations, those whose tenders will be approved will have to keep an amount of 3% of the total supply order amount as security deposit with the Sansthan as a guarantee to supply the goods within the prescribed period. This security deposit amount will be refunded after the supply of the said materials. No interest will be earned on security deposit or earnest money.
2. A security deposit of 3% is to be paid immediately after the tender is approved. Also it will be mandatory to appear at Shirdi and notarize the instant agreement on stamp paper of Rs.100/-. The notary fee of the contract has to be paid by the tenderer.

**J. Term for supply of Edible Oil**

1. The period of supply of Edible oil will be from April 2023 to June 2023, July 2023 to September 2023, October 2023 to December 2023 & January 2024 to March 2024.
2. Edible Oil should be supplied within 10 days from the date of issuing the edible oil as per the schedule given in the demand challan. In some cases, the supply will have to be done even after informing on telephone.
3. If the temple has to be closed due to natural calamities, epidemics, then the Sansthan will not be bound to purchase the oil as per the estimated quantity shown in the e-tender during such period. The edible oil requirement for the Prasadalaya may be less or more than the estimated quantity shown in the e-tender, depending on the number of devotees taking Prasad Bhojan. Therefore, it will not be binding on the Sansthan to purchase goods up to the estimated quantity in the e-tender.
4. Since the said demand of the Sansthan is estimated, during the supply period or even after the procurement process of the next year should be completed, if the Sansthan demands 25 percent more edible oil than the approved quantity, it will be obligatory on the tenderer to supply the edible oil at the accepted rate.
5. After giving the supply order, the supply of the edible oil mentioned in the supply order is not at once. The demand challan will be sent to the supplier every month as per the requirement of the Sansthan. The quantity mentioned in the supply order will be approximate and the actual demand will depend on the number of devotees. Therefore, it will not be binding on the Sansthan to purchase the quantity mentioned in the e-tender or supply order.



28/3

K. **Method of acceptance of Edible Oil-**

1. Supply of Edible Oil shall be as per Brand/description in supply order and bill of goods/materials shall be submitted accordingly.
2. The Edible Oil for which tenders are approved Brand must be of approved quality and type. Inferior quality, different Brand or substandard Oil will not be accepted. If such Oil is supplied, it will be binding on the tenderer to take it back immediately at their own expense. If it is not carried, the Sansthan will not be responsible for the damage of the same.
3. After issuing the supply order to the supplier, the supplier shall be bound to supply the Edible Oil as per the Brand selected by the expert committee of the Sansthan.
4. After sending the Edible Oil to the Sansthan as per the supply order, the Oil will be inspected by the system prescribed by the Sansthan. The Oil will be accepted if they think fit. The suppliers should ensure that the Oil is supplied as per the given sample.
5. Since the quantity of Edible Oil being supplied is huge, the Oil is accepted by randomly sampling from the Sansthan. However, if any lot or container or any defective Oil is found after receiving it to be replaced at his own cost.
6. The label on the container of Edible Oil should be as per the provisions of Food Safety Rules 2011 and Valid Measurements.
   It should mention the following items.
   1. Manufacturer's FSSAI License No.
   2. Brand & Quantity
   3. Lot No/ Batch No & Date of Manufacturing
   4. Warranty as to quality and standards as required by law
7. Certificate of Analysis of Edible Oil of N.A.B.L./Govt. lab/in house lab of the Manufacturing Company. A copy of the same should be given while supplying the edible oil to the Sansthan.
8. Edible oil has to be supplied in new tin cans of 15 kg/15 ltr. Also the container should preferably have a berry cap style lid.
9. If the Edible Oil supplied in the supply order are found to be adulterated or of inferior quality, the respective supplier shall be solely responsible for the same.
10. The material used for packing the Edible Oil should be Food grade.
11. The weight of the supplied oil excluding the tin weight will be taken into account.

L. **Procedure for the laboratory testing-**

1. The supplied Edible Oil will be tested as per requirement by Sansthan's Laboratory/ District Health Laboratory/ NABL/ Central Govt/State Govt approved laboratory.
2. If the report of the supplied Edible Oil is not as per IS Standards in the lab inspection conducted by the Sansthan, the said Oil will have to be replaced. Meanwhile, if the Sansthan has to procure Oil from outside, the amount of

excess expenditure incurred plus a penalty of 5 per cent of the Oil supplied price will be recovered from the bill amount of any Oil payable/Security Deposit.

3. Sometimes there is a delay in getting the lab report, if the consignment is used and then the lab report is not as per IS Standard, a penalty of 5 per cent of the price of the consignment in that lot will be levied.
4. If the lab report of the same type of Edible Oil does not conform to IS Standards for three consecutive times, appropriate action will be taken by the Sansthan against the said supplier. No complaint of the supplier will be entertained in this regard.
5. If the report of the Sansthan lab is not as per IS Standards, the same sample will be re-verified at NABL/Central Govt. lab at Mumbai. The inspection report of the said lab will be considered final.

**M Method/ procedure of payment of bills.**

1. The bill for the Edible Oil supplied shall be paid only after the Oil have been inspected and ascertained to be of correct quality and quantity. No advance will be given for supply of Oil.
2. Efforts will be made to make payment to the concerned supplier within 30 days from the date of submission of the bill to the Sansthan for Oil supplied.
3. If the Edible Oil supplied by the tenderer is rejected by the Sansthan and as a result the Sansthan has to purchase the Oil from another Supplier at market price for the next period, the excess cost will be recovered from the Security Deposit amount or other Oil bill payable by the Sansthan.
4. Tax deductions as required by government rules will be made from the bill.

**N. Provision regarding calamities/ natural calamities, compensation and penal action :-**

1. If the Edible Oil in the supply order are not supplied within the time limit, penal action will be taken as follows:

| | |
|---|---|
| a) If the value of goods not supplied is less than Rs.2.00 lakhs | 0.50% per week up to a maximum of 10% |
| b) If the value of goods not supplied is Rs.2.00 lakhs or more | 0.50 % per week up to a maximum of 5 % |

2. If the Edible Oil is not supplied within a maximum of 10 days from the date of issue of the order given over the phone or as per the schedule given in the demand challan, or if the Oil is rejected due to not being of the right quality, the Sansthan will be allowed to purchase the Oil from the other party as much as required at the market price or as much as the order given. The excess amount (difference) for such purchased Oil shall be reimbursed by the tenderer to the Sansthan. The Sansthan reserves the right to recover the said compensation from the Security Deposit amount or from previous/subsequent invoices.
3. It is mandatory to supply the Edible Oil at the approved rate and as per the sample selected in the tender. The Supplier shall not have the right to ask for any increase in the approved rate for any reason or such increase shall not be granted. If the supplier refuses to supply the Oil or does not supply the Oil, the Sansthan has to purchase the Oil at the market price or by asking for re-tendering, the compensation for the excess expenses will be recovered from the

supplier. Also appropriate action will be taken in this regard as per the decision taken by the Ad-Hoc Committee/Management Committee/Sub-Committee/Chief Executive Officer of the Sansthan. No complaint of the supplier will be entertained in this regard.

4. During the tender supply period due to a calamity/natural calamity (a calamity beyond the control of the supplier eg. war, heavy rains, drought, kidnapping, casualty, pestilence, strike, explosion, lockout, earthquake etc.) the supplier is unable to supply the oil. The Supplier informed in writing, the appropriate decision in this regard will be taken according to the situation. However, the said provision is limited to condoning the delay in supply only and will not be applicable in case of increase in market price above the sanctioned rate in the above circumstances. The supplier is bound to supply at the approved rate even if the price rises in the market. If the supplier does not supply the security deposit amount will be forfeited or the decision of the Hon'ble Ad Hoc Committee/Hon'ble Management Committee/ Hon'ble Sub-Committee/ Hon'ble Chief Executive Officer shall be binding on the supplier. No complaint will be entertained in this regard.

5. The tenderer should not have any claim/application pending in any court against the Sansthan of any nature whatsoever. Also the tenderer's name should not be included in the black list of the Sansthan. If a claim is filed against the Sansthan, the tender of the said tenderers will not be considered.

**O** **Tender Validity Period -**

1. The validity period of the said e-tender will be 120 days from the last date of online tender.

**P.** **General Terms and Conditions**

1. If a tenderer withdraws from the tender at any stage during the tender process, his earnest money will be forfeited.
2. If required, Vendor Audit will be done of the supplier/ firm.
3. In case of dispute regarding the said transaction, it will remain under the jurisdiction of Rahata/Kopargaon Court.
4. As per Rule No. 3.1.2.8 of the Government's Revised Purchase Rules, if the out-of-state supplier is the lowest and if the Maharashtra state supplier is the second lowest, then to encourage the Maharashtra state suppliers, the Maharashtra state supplier is ready to supply the oil as per lowest rate, 50% of the total goods to be procured will be ordered to the in-state supplier and if they are not ready, then the entire order will be given to the out-of-state supplier.
5. If the supplier refuses to supply the Edible Oil and violates any of the terms and conditions specified by the Sansthan, the security deposit amount will be forfeited and the name of the supplier will be blacklisted for the next 3 years. The decision taken by the Hon'ble Ad Hoc Committee/ Hon'ble Management Committee/ Hon'ble Sub-Committee/ Hon'ble Chief Executive Officer in this regard shall be binding on us. No complaint will be entertained by the supplier in this regard.

6. The Sansthan reserves the right to accept any tender partially/fully or reject all tenders.
7. Conditional tenders will be cancelled immediately. The tenders of the tenderers who fail to fulfil the conditions and qualifications mentioned in the said tender will be cancelled.
8. The Sansthan Management reserves the right to make any changes, amendments or to prescribe additional terms/conditions in the above terms and conditions. Any condition/conditions of the tenderer will not be binding on the Sansthan, such tenders will not be considered.

**(Rahul Jadhav)**
**I/c.Chief Executive Officer,**
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

# Information about Tenderers

1. Name of the Firm- ------------------------------------------------

2. Detailed address for correspondence - ------------------------------------------------

------------------------------------------------

3. Telephone No.- ------------------------------------------------

   Office- ------------------------------------------------

   Shop- ------------------------------------------------

   Resident- ------------------------------------------------

   Mobile No- ------------------------------------------------

   Fax No- ------------------------------------------------

   E-mail ------------------------------------------------

4. Name of contact person - ------------------------------------------------

   Telephone/ Mobile No - ------------------------------------------------

5. Names of Proprietor/Partners 1. ------------------------------------------------

   2. ------------------------------------------------

6. Bank Account Name 1.------------------------------------------------

   Branch 2. ------------------------------------------------

   Acc. No and Type 3.------------------------------------------------

   IFSC Code 4.------------------------------------------------

Date :- / /2023
Place :-

Signature and seal of tenderer



8/28/3

## A) Documents in the Technical Bid (Check List)

1. Updated shop registration certificate/ certificate from local self-government body/ similar government license/Certified copy of latest partnership deed in case of partnership firm/Firm/ Company/Sanstha Registration Certificate.i.e. Power of attorney in case of Partnership firm/Public Limited Company/ Private Limited Company/Society/Government undertaking/ Company Registration Certificate/Partnership Deed, duly registered with Registrar, Articles of Association, Society Registration Certificate

2. GST Registration Certificate/GST Online Registration Acknowledgement

3. PAN Card

4. Certificate from Chartered Accountant regarding average annual turnover for the financial years 2019-20, 2020-21 and 2021-22. (Minimum annual turnover is Rs.1,38,70,000/- mandatory)

5. Updated Food and Drug Administration Registration License (FSSAI/BIS License/Degree of its equivalence)

**B)** **Samples of the Edible Oil sealed in separate cloth bag with signature on the upper side stating the type of goods, name of the firm etc.**

**C)** **List of goods sample**

Date - / /2023

Place - **Signature and seal of tenderer**

To,
**Hon.Chief Executive Officer,**
Shri Saibaba Sansthan of Trust (Shirdi)
Shirdi, District Rahata, District-Ahmednagar.

**Subject – Regarding e-tender for Supply of Edible Oil for Prasadalaya and Temple Departments for April 2023 to March 2024...**

Respected!

I/We, the undersigned, declare that we have read the tender published regarding the above subject. I/we have read all the terms and conditions given in your tender and I/we agree. I/we agree to abide by your terms/conditions.

I/We undertake to deliver to you the Edible Oil mentioned in the tender, for the above period as per your demand, as per the requirement of the Sansthan, at the time required, at the warehouse of Shree Saibaba Sansthan Trust (Shirdi). As the quantity of the said goods is approximate, I/we guarantee to supply the same at the approved rate if the sansthan demands up to 25% more than the specified quantity from time to time.

I/We shall pay in cash within 15 days from the date of notification of acceptance of the tender a sum of 3% of the total amount of the tendered goods as security deposit to guarantee supply of the goods at the agreed rate for which the tenders are accepted. For this I consent to the classification of earnest money security deposit accounts. Also, we shall notarize the agreement on the prescribed stamp paper and it shall be our obligation to deliver the goods as per the sample to the central warehouse at Shirdi on time during the tender period at the approved rate.

Dated - / /2023
Place -

Yours/Yours faithfully,

Name of Proprietor/Partner of the Firm and Seal

Signature/Signatures

(1) ------------------------------------
(2) ------------------------------------

Enclosed documents

# Annual Turnover Certificate

This is to certify that M/s.---------------------------------------------------------------the financial turnover of 3 years (2019-20, 2020-21 and 2021-22) of their tender related business is as follows.

| Sr.No. | Year | Annual Ternover |
|---|---|---|
| 1 | Year 2019-20 | |
| 2 | Year 2020-21 | |
| 3 | Year 2021-22 | |
| | Total | |
| Average annual turnover for above 3 years | | |

Date :-
Place :-

Signature of Auditor/Chartered Accountant
(Name /Sign Stamp)
Reg.No.

STATEMENT SHOWING PURCHASE OF EDIBLE OIL FOR THE YEAR 2023-24

# BOQ

**April 2023 to June 2023**

| Sr.No. | Description | Approximate Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, **As per IS 4277:2014 Standard** New 15Kg.Tin | 700.500 | Quintal | | |

(Rahul Jadhav)
I/c Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

STATEMENT SHOWING PURCHASE OF EDIBLE OIL FOR THE YEAR 2023-24

# BOQ

**July 2023 to September 2023**

| Sr.No. | Description | Approximate Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, **As per IS 4277:2014 Standard** New 15Kg.Tin | 700.500 | Quintal | | |

(Rahul Jadhav)
I/c Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

STATEMENT SHOWING PURCHASE OF EDIBLE OIL FOR THE YEAR 2023-24

# BOQ

**October 2023 to December 2023**

| Sr.No. | Description | Approximate Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, **As per IS 4277:2014 Standard** New 15Kg.Tin | 700.500 | Quintal | | |

(Rahul Jadhav)
I/c Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

STATEMENT SHOWING PURCHASE OF EDIBLE OIL FOR THE YEAR 2023-24

# BOQ

**January 2024 to March 2024**

| Sr.No. | Description | Approximate Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, **As per IS 4277:2014 Standard** New 15Kg.Tin | 700.500 | Quintal | | |

(Rahul Jadhav)
I/c Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi